21 NOV 2025

तरुण भारत



कोल्हापूर : माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील आदी.

# शिवाजी विद्यापीठात इंदिरा गांधींना अभिवादन

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या प्रांगणातील मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अहिंसा व एकतेची शपथ ग्रहण करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रामचंद्र पवार, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव, गजानन पळसे, सुरेश बंडगर, सुरेखा अडके, अनिल साळोखे, प्रांजली क्षीरसागर यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

2 1 NOV 2025
पुण्यनगरी



कोल्हापूर : प्रकाश कांबळे यांना सपत्नीक पुरस्कार देताना कुलगुरू सुरेश गोसावी, ज्योती जाधव, विजय माहेश्वरी यांच्यासह मान्यवर.

# प्रकाश कांबळे यांना गुणवंत सेवक पुरस्कार

गडहिंग्लज : येथील ओंकार महाविद्यालयातील मुख्य लिपिक प्रकाश कांबळे यांना शिवाजी विद्यापीठाचा गुणवंत सेवक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांनी महाविद्यालयीन सेवेबरोबरच विविध प्रकारच्या सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन कार्य केले आहे. त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना पुरस्कार देण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र. कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, प्रा. डॉ. विजय माहेश्वरी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. पुरस्काराबद्दल संस्थाध्यक्ष राजन पेडणेकर, प्र. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी कांबळे यांचे अभिनंदन केले.

2 1 NOV 2025
लोकमत




शिवाजी विद्यापीठाच्या सात महिला खेळाडूंची चंडिगड येथे होणाऱ्या अखिल भारतीय महिला ज्यूदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

# शिवाजी विद्यापीठाच्या सात ज्यूदो खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र

## साऊथ वेस्ट स्पर्धेत महिला संघाने पटकाविले यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भोपाळ येथील सेग विद्यापीठात झालेल्या साऊथ-वेस्ट झोन आंतरविद्यापीठ स्पर्धेतून शिवाजी विद्यापीठाच्या सर्व सातही सहभागी महिला खेळाडूंची चंडिगड येथे होणाऱ्या अखिल भारतीय महिला ज्यूदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

साऊथ-वेस्ट महिला ज्यूदो स्पर्धेसाठी निवड समितीने निवडलेल्या आंतरविभागीय महिला ज्यूदो संघांचे स्पर्धापूर्व शिबिर शिवाजी विद्यापीठात झाले. त्यात विद्यापीठ महिला ज्यूदो संघाने उत्तम कामगिरी केली. शिवाजी विद्यापीठाचे व्यवस्थापन समिती सदस्य सिद्धार्थ शिंदे आणि क्रीडा विभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, छत्रपती शहाजी महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. प्रशांत पाटील, निवड समिती सदस्य डॉ. विनायक भागवत, ज्यूडो प्रशिक्षक डॉ. धनंजय पाटील, डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते. या खेळाडूंना प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. संग्राम मोरे यांचे प्रोत्साहन लाभले. शिवाजी विद्यापीठ व छत्रपती शहाजी कॉलेज यांच्यातर्फे शिवाजी विद्यापीठात साऊथ-वेस्ट स्पर्धा पार पडल्या होत्या.

निकाल असा - वैष्णवी पाटील : ४८ किलो वजनगट, समृद्धी पाटील (कांस्य पदक) ५२ किलो वजनगट, साक्षी मगदूम (कांस्य पदक) ५७ किलो वजनगट, अमृता चौगुले : ६३ किलो वजनगट, समीक्षा शेलार (रौप्यपदक) ७० किलो वजनगट, संस्कृती पाटील, ७८ किलो वजन गट, पल्लवी कुमार जाधव, ७८ किलोवरील वजनगट.